प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत
अनुसूचित जाती प्रवर्गाचा राज्य हिस्सा
राज्यस्तरावरून अर्थसंकल्पित व वितरीत
करण्यासाठी नवी लेखाशिर्षास मान्यता
देण्याबाबत...

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः प्रआयो-२०१७/प्र.क्र.३६७/योजना-१०**
बांधकाम भवन, २५ मर्झबान रोड,
फोर्ट मुंबई-४०० ००१.
तारीख: १६ मे, २०१८

वाचा-

१) **शासन निर्णय क्रमांकः इंआयो-२०१५/प्र.क्र.३२९/योजना-१०, दि.१७.७.२०१५.**
२) **शासन परिपत्रक क्रमांकः इंआयो-२०१५/प्र.क्र.४१३/योजना-१०, दि.१०.२.२०१६.**
३) **शासन निर्णय क्रमांकः पीएमएवाय-जी-२०१६/प्र.क्र.३३३/योजना-१०, दि.१४.१०.२०१६.**

**प्रस्तावना-**

प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत अनुसूचित जाती उपयोजनेखाली (SCSP) जिल्हा स्तरावरील निधी राज्य स्तरावर अर्थसंकल्पीत करून तो राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांना वितरीत करावयाचा आहे. सदरचा निधी जिल्हा नियोजन समितीमार्फत आहरित करून तो राज्यस्तरीय बँक खात्यात जमा करण्यासाठी अनेक अडचणी येत असल्याने व Fund Flow मध्ये झालेल्या बदलामुळे अनुसूचित जाती उपयोजनेखाली (SCSP) राज्य हिश्याचे नवीन लेखाशिर्ष सुरू करण्याची बाब विचाराधीन होती.

**शासन निर्णय-**

प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत अनुसूचित जाती उपयोजनेखाली (SCSP) जिल्हा स्तरावरील निधी राज्य स्तरावर अर्थसंकल्पीत करून तो राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांना वितरीत करावयाचा आहे. सदरचा निधी जिल्हा नियोजन समितीमार्फत आहरित करून तो राज्यस्तरीय बँक खात्यात जमा करण्यासाठी अनेक अडचणी येत असल्याने व Fund Flow मध्ये झालेल्या बदलामुळे अनुसूचित जाती उपयोजनेखाली (SCSP) राज्य हिश्याचे नवीन स्वतंत्र लेखाशिर्ष सुरू करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

| संवर्ग | लेखाशिर्ष मराठी | लेखाशिर्ष इंग्रजी |
|---|---|---|
| अनुसूचित जाती SC | **मागणी क्र.एल-०३**<br>२५०५ ग्रामीण सेवायोजन,<br>६० इतर कार्यक्रम पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, ७८९-अनुसूचित जाती उपयोजना,<br>(०१) प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण)<br>(०२) (०१) प्रधान मंत्री आवास योजना (ग्रामीण) (अजाउयो) (राज्य हिस्सा ४०%), (२५०५ ए०५८) ३१ सहायक अनुदान (वेतनेतर) | **Demand no.L-03**<br>2505 Rural Employment,<br>60-Other Programme Scheme in the Five Years Plan,<br>789- Scheduled Caste Sub Plan,<br>(01) Pradhan Mantri Awaas Yojana (Gramin),<br>(02) (01) Pradhan Mantri Awaas Yojana (Gramin) (SCSP) (State Share 40%) (2505 A058) 31 Grant-in-aid (Non-Salary) |

सदरचा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.१८/२०१८/व्यय-१५, दि.२५.१.२०१८ व क्र.१७/अर्थ-१७, दि.५.२.२०१८ च्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०५१४१२३३१५०९२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Anil Madhao Kale

Digitally signed by Anil Madhao Kale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e29bfbc8f31dc2b43b5ba876864f627ec1dc888a2c6faead66c26cb1a5c2f137, cn=Anil Madhao Kale
Date: 2018.05.16 14:59:09 +05'30'

**(अनिल मा. काळे)**
**अवर सचिव, ग्राम विकास विभाग**

प्रत,

१. मा.मंत्री, ग्राम विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा.राज्यमंत्री, ग्राम विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
४. महालेखापाल (लेखापरीक्षा) महाराष्ट्र, १ व २, मुंबई/नागपूर
५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र १ व २, मुंबई/नागपूर
६. विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व)
७. जिल्हाधिकारी (सर्व)

८. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.तथा अध्यक्ष जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा (सर्व)
९. संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण,सी.बी.डी., बेलापूर (५प्रतीसह)
१०. प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा (सर्व)
११. उप सचिव, वित्त विभाग (व्यय-१५/अर्थ-१७/अर्थ-१९), मंत्रालय, मुंबई
१२. उप सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग (वि.घ.यो.), मंत्रालय, मुंबई
१३. उप सचिव, नियोजन विभाग (का.१४४४/१४८१/१४८२), मंत्रालय, मुंबई
१४. संचालक, लेखा व कोषगारे, नवीन प्रशासन भवन, मंबई
१५. संचालक, निवासी व लेखाधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१६. जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व)
१७. सह सचिव/उप सचिव, ग्राम विकास विभाग (सर्व कार्यासने)
१८. निवड नस्ती योजना-१०.